फौजदारी किरकोळ अर्ज. **<u>१११/२०२४</u>**
संगिता विरूद्ध अंबादास
**निशाणी ०९ खाली**

**<u>अर्जदार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ संगिता अंबादास नेवारे हिची उलटतपासणी शपथेवर सुरू — गैरअर्जदारातर्फे ॲड. श्रीमती. आर. आर. सांगोळे यांचे मार्फत</u>**

माझे लग्न सन १९९४ मध्ये झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती बाहेरगावी नौकरीला होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येकवेळी मी गैरअर्जदारासोबत राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, जोपर्यंत मी गैरअर्जदारासोबत राहत होते तो पर्यंत मी कोणत्याही पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आजपावेतो गैरअर्जदाराविरूध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे सांगण्यावरून गैरअर्जदार याने सेवा निवृत्तीनंतर चोहोट्टा बाजार येथे भुखंड विकत घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, भुखंड विकत घेण्यासाठी कर्ज मिळणेकामी माझे वडिलांनी सदरचा प्लॉट स्वतःचे नावावर करून घेतला. सदर भुखंड सध्या माझे वडिलांच्या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे आईसोबत राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईला सेवानिवृत्ती वेतन मिळते. हे म्हणणे खरे नाही की, सदर भुखंडावर बांधकाम करण्यासाठी गैरअर्जदार याने रू. १,५०,०००/— दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिलांनी गैरअर्जदाराची फसवणुक व बेईमानी करून तो भुखंड मिळवला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिलांकडे चार एकर शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, सेवानिवृत्तीनंतर गैरअर्जदाराने कापड विक्रीचे दुकान टाकले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर दुकानाचा सर्व व्यवहार माझेकडे होता. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, गैरअर्जदार खेडोपाडी कपडे विकायचा व मी दुकानात बसायची व गैरअर्जदार आल्यावर त्याला दिवसाचा हिशोब दाखवायची. हे म्हणणे खरे आहे की, शेवटी माहेरी परत येण्यापुर्वी मी अमरावती येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार याचेवर रू. १०,००,०००/— कर्ज झाले म्हणुन मी त्याला सोडुन माहेरी निघुन आली आहे. प्रस्तुत केस दाखल करण्याआधी मी महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षणाचा कायद्यानुसार गैरअर्जदाराविरूध्द केस दाखल केलेली होती. हे म्हणणे

खरे आहे की, त्या केसमध्ये मी माझे मुलींना देखील साक्ष देण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दोन्ही मुलींचे लग्न झालेले आहे. माझी कोणतीही मुलगी नौकरी करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुली नौकरी करत नाही हे मी खोटे सांगत आहे.

प्र.१. गैरअर्जदार याचा चोहोट्टा बाजार येथे बांधीव घर आहे, त्यात तुम्ही गैरअर्जदारासोबत राहु शकता का ?

उ. गैरअर्जदाराचा असा कोणताही प्लॉट नाही.

प्र.२. तुम्ही गैरअर्जदारासोबत राहु शकता का ?

उ. नाही.

२. गैरअर्जदार याची आई जिवंत आहे. गैरअर्जदाराला मिळत असलेली पेन्शनची रक्कम त्याचा व त्याच्या आईचा उदरनिर्वाह करण्यास पुरेशी नाही किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुलींच्या लग्नात मी गैरअर्जदाराला बोलवले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षणाचा कायद्यानुसार गैरअर्जदाराविरूध्द केलेली केस न्यायालयाने नाकारली होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार याने मला माहेरून रू. १,००,०००/— आणण्याची मागणी केली हे मी खोटे सांगत आहे. मी गैरअर्जदाराच्या सदर मागणीबाबत पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला होता. सदर रिपोर्टची प्रत प्रस्तुत प्रकरणी अभिलेखावर दाखल आहे. सदर रिपोर्टनुसार घरी येउन चौकशी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार माझे चारित्र्यावर संशय घेत होता हे मी खोटे लिहिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला स्वेच्छेने माहेरी राहायचे आहे म्हणुन मी गैरअर्जदारासोबत नांदायला जाण्यास तयार नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, तो मला मारहाण करतो म्हणुन मी जाण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा ब्युटी पार्लरचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, ब्युटी पार्लरच्या व्यवसायावर माझा उदरनिर्वाह होत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारावर खुप सारे कर्ज असल्यामुळे तो खावटी देउ शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षणाचा कायद्यानुसारची केस न्यायालयाने नाकारली म्हणुन

गैरअर्जदाराला मुद्दाम त्रास देण्यासाठी प्रस्तुत खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १९.११.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.